पुण्य नगरी

4 मंगळवार २३ जुलै २०१९ पुणे

Zeal College of Engineering & Research
LIBRARY
801
ZCOER
Narhe, Pune-41.

# News Line

## झीलच्या विद्यार्थ्यांची सीडीएसीला औद्योगिक भेट




**पुणे** : झील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगमधील माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे पुणे इथे नुकतीच शैक्षणिक व औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली होती. द्वितीय वर्षाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने या सहलीमध्ये सहभागी झाले होते. परम सुपरकॉम्प्युटरच्या विविधपूर्ण वैशिष्ट्यांविषयी विद्यार्थ्यांनी सखोल माहिती घेतली. तेथील अधिकाऱ्याकडून मिळालेल्या तांत्रिक तपशिलाचा विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर ऑर्गनायझेशन ॲण्ड आर्किटेक्चर या विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये नक्कीच फायदा होणार आहे. ही भेट आयोजित करण्यासाठी संस्थेचे सचिव जयेश काटकर, कार्यकारी संचालक प्रदीप खांडवे, प्राचार्य डॉ. अजित काटे आणि विभागप्रमुख डॉ. योगेश गुरव यांचे मार्गदर्शन लाभले. या औद्योगिक भेटीच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. निहाल शिकलगार, प्रा. प्रणालिनी जोशी, प्रा. अमरनाथ चडचणकर आणि प्रा. शितल बाचपल्ले यांनी परिश्रम घेतले.